**महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग,शासन निर्णय क्र.जिपब-४१४/प्र.क्र.११२/आस्था-१४ दि. १५ मे २०१४ नुसार धुळे जिल्हा परिषदेतील गट-क (वर्ग-३) गट-ड (वर्ग-४) कर्मचाऱ्यांच्या बदल्यांच्या धोरणाची अंमलबजावणी सन २०२६ बाबत संभाव्य वेळापत्रक**

| जिल्हास्तरीय बदल्यांचे वेळापत्रक | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **कार्यसूची** | **दिनांक** |
| १ | खातेप्रमुख / गट विकास अधिकारी यांनी (प्राथमिक आरोग्य केंद्रावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या माहितीसह) संवर्गनिहाय वास्तव्य ज्येष्ठता यादी जिल्हा परिषदेस सादर करणे. | १२ एप्रिल २०२६ |
| २ | खाते प्रमुखांनी संवर्गनिहाय वास्तव्य सेवा ज्येष्ठता याद्या संबंधीत खातेप्रमुख / गट विकास अधिकारी यांचेकडून प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या एकत्रित वास्तव्य सेवा ज्येष्ठता याद्या तयार करुन तात्पुरती वास्तव्य सेवा ज्येष्ठता प्रसिध्द करणे. | १७ एप्रिल २०२६ |
| ३ | तात्पुरती वास्तव्य सेवा ज्येष्ठता प्रसिध्द केल्यानंतर आक्षेप व सूचना मागविणे. तसेच अंतिम मान्यतेसाठी सामान्य प्रशासन विभागाच्या अभिप्रायास्तव सादर करणे. | १८ एप्रिल ते २७ एप्रिल २०२६ |
| ४ | आक्षेप व सूचनांचे निराकरण करुन अंतीम वास्तव्य सेवा ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणे. | ०२ मे २०२६ |
| ५ | प्रत्यक्ष बदली प्रक्रिया समुपदेशनाने पार पाडणे. | ५ मे ते १५ मे २०२६ |
| **तालुकास्तरीय बदल्यांचे वेळापत्रक** | | |
| **अ.क्र** | **कार्यसूची** | **दिनांक** |
| १ | गट विकास अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांच्या संवर्गनिहाय वास्तव्य सेवाज्येष्ठता याद्या तयार करुन प्रसिध्द करणे. | १२ एप्रिल २०२६ |
| २ | तात्पुरती वास्तव्य सेवा ज्येष्ठता प्रसिध्द केल्यानंतर आक्षेप व सूचना मागविणे. | १३ एप्रिल २०२६ ते २२ एप्रिल २०२६ |
| ३ | आक्षेप व सूचनांचे निराकरण करुन अंतीम वास्तव्य सेवा ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणे. | ३० एप्रिल २०२६ |
| ४ | प्रत्यक्ष बदली प्रक्रीया समुपदेशनाने पार पाडणे. | १६ मे ते २५ मे २०२६ |

तरी सर्व वर्ग-३ व वर्ग-४ मधील कर्मचारी यांना सुचित करण्यात येते की, जिल्हांतर्गत विनंती बदलीसाठी (एका पंचायत समिती क्षेत्रामधून अन्य पंचायत समिती क्षेत्रातंर्गत) विनंती बदलीचे अर्ज शासन निर्णय दिनांक १५ मे २०१४ सोबत असलेल्या परिशिष्ट-१ मध्ये दिलेल्या विहीत नमुन्यातील अर्ज दिनांक २५ एप्रिल २०२६ पर्यंत संबंधीत विभागाचे खातेप्रमुख/गट विकास अधिकारी यांचेमार्फत सादर करावेत.

( चंद्रकांत साबळे )
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)**
**जिल्हा परिषद,धुळे**